## भुसावळ येथे औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्पात रोटरी पार्ट उभारणी

"विजेचा प्रश्न सोडविण्यासाठी राज्य शासन सर्वस्तरावर प्रयत्न करत असून राज्यभरात विविध ठिकाणी वाढीव वीज प्रकल्प हाती घेण्यात आले आहे. त्यामुळे टप्याटप्याने महाराष्ट्र भारनियमनातुन बाहेर पडत असून येत्या २०१२ मध्ये राज्य पूर्णपणे यातून मुक्त झालेले असेल, असा आत्मविश्वास ऊर्जामंत्री ना.सुनिल तटकरे यांनी व्यक्त केला".

मा.ना.तटकरे हे भुसावळ औष्णिक वीजनिर्मिती केंद्राच्या नवीन प्रकल्प संच क्र.४ च्या रोटरी पार्ट उभारणी या महत्वपुर्ण टप्प्याच्या शुभारंभप्रसंगी बोलत होते. प्रारंभी सर्व अधिकारी व कंत्रटदाराच्यावतीने मा.ना.तटकरे, पालकमंत्री ना. सतीश (अण्णा) पाटील व खा.हरिभाऊ जावळे यांचा सत्कार झाला. मा ना.श्री.तटकरे पुढे म्हणाले की, विजेच्या अभावामुळे राज्याच्या प्रगतीवर निश्चित काहीसा परिणाम झाला होता.यावर उपाययोजनेसाठी आम्ही जाणीवपूर्वक प्रयत्न केले आहेत. या भागातील शेतकरी व प्रकल्पासाठी ज्यांनी जमिनी दिल्या त्यांना धन्यवाद देतो. राष्ट्राच्या उभारणीत येथील भूमिपुत्रांचे योगदान मोठे आहे. त्यांचाही नक्कीच विचार करु, असे सांगितले. ते पुढे म्हणाले की, केवळ गळतीवरच न थांबता चोरी थांबविण्यासाठी उच्च क्षमतेचे ट्रान्सफार्मर व इतर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर येणाऱ्या काळात करणार आहोत, या प्रसंगी खा. हरिभाऊ जावळे म्हणाले हा प्रकल्प आता पूर्णत्वास येत आहे. इतका मोठा प्रकल्प याची भव्यता जवळून अनुभवण्यात आली. या प्रकल्प उभारणीमध्ये शेतकरी , लहानात - लहान मजूर यांचा मोठा वाटा आहे. हे प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालावे व त्यासाठी उच्च दर्जाचा कोळसा उपलब्ध व्हावा. तसेच पर्यावरणाचादेखील विचार व्हावा, असे मत खा.जावळे यांनी व्यक्त केले.

पालकमंत्री डॉ.सतीश पाटील म्हणाले की, राज्याच्या दृष्टीने महत्वाचा प्रकल्प आहे. या चांगल्या कामाला येथील लोकप्रतिनिधींचे सहकार्य लाभले म्हणून हा महत्वाकांक्षी प्रकल्प उभा राहिला व भुसावळाचे नाव राज्यात लौकिकाला आले,असे ना.पाटील यांनी सांगितले.याप्रसंगी सर्वश्री अरुण डवलेकर प्रभारी संचालक (प्रकल्प),मधुकर शेलार संचालक (संचलन),अरविंद चौधरी कार्यकारी संचालक (मानव संसाधन), माणिक वाघमोडे कार्यकारी संचालक (सां.नि.) भालचंद्र गोखले प्रभारी कार्य कारी संचालक (प्रकल्प),रवींद्र गौर, मुख्य महाव्यवस्थापक भुसावळ (प्रकल्प) , गजानन तुळणकर, मुख्य महाव्यवस्थापक (स्थापत्य),भुसावळ औ.वि.कें. हे उपस्थित होते.

## श्री. सोमानी यांनी सांगितले सादरीकरणाचे तंत्र

सद्या बाजारीकरणाचे युग आहे, तुमच्या जवळ जे काही चांगले आहे ते इतरांना सांगण्याचा काळ आहे. प्रत्येकाला स्वत:च्या नावाचे विशेष महत्त्व आहे. स्वत:चे व्यक्तिमत्त्व फुलवायचे असेल तर आपल्या आचरणात बदल करणे गरजेचे आहे, अगदी रागावतानादेखील रागावण्याची पध्दत बदलवून बघा. जाहिरातीच्या युगात जीवघेणी स्पर्धा सुरु आहे. मात्र आपल्या उत्पादनाचा खप वाढावा याकरिता सृजनात्मक आगळीवेगळी जाहीरात तयार करुन दर्शकाला आकर्षित करण्यात येते. सकारात्मक विचारातून प्रत्येक लहान-सहान गोष्टीसाठी जर आभार मानलेत तर दुसऱ्याला बरे तर वाटतेच, त्याचा अप्रत्यक्ष फायदा आपल्यालाही होतो. यशस्वी व्यक्तिमत्त्व किंवा विजेते मंडळी नेहमी 'जरा हटके' पध्दतीचा स्वीकार करीत असतात. प्रत्येकाला आपली तारीफ होत असेल तर आवडेलच ना. त्यामुळे समोरच्या व्यक्तीला समजून घ्या आणि लागेल तर स्वत:ला विसरा. आई, पत्नी आणि सुनेचे उदाहरण देताना श्री. सोमानी यांनी सांगितले की भोजनाला बोलविण्याच्या पध्दती देखील वेगवेगळया असतात. उदाहरणार्थ आई म्हणेल, बेटा, ताट वाढले आहे, जेवण करुन घे, पत्नी म्हणेल, अहो जेवण करता का?, सुन म्हणेल, तुम्ही जेवणार असाल तर जेवण करुन घ्या. देहबोली, भावना आणि शब्दशैली यावर सादरीकरण प्रभावी होत असते. वर्गणी मागण्याकरिता आलेली व्यक्ती आणि त्यावेळी आपला चेहरा व पोस्टमन आपल्यासाठी मनीऑर्डर /विमाहफ्त्याचा किंवा शेअर्सचा धनादेश घेऊन येतो तेव्हा आपल्या चेहऱ्याचे भाव वेगळे असतात. प्रभावी सादरीकरणाकरिता आपला अहंकार बाजूला सारायला हवा. इतरांना आनंदी तथा सुखी ठेवण्यातच आपले सुख आहे ही भावना वृध्दींगत झाल्यास त्याचा अप्रत्यक्ष लाभ आपल्यालाच होतो. इतरांना चांगली वागणूक द्या, जी तुमच्या हातात आहे. शक्यतो हसरा चेहरा ठेवा, वैचारिक मतभेद असतील तर काही हरकत नाही, मात्र मनभेद नको.

शब्दांनी जग जिंकता येते एवढाच सकारात्मक भाग या उदाहरणांतून घ्यावा असे सुचविले. त्यानंतर श्री. सोमानी यांनी पतीकडून पत्नीसाठी साडीची खरेदी, तसेच कच्चे फळ आंबट असते तर परिपक्व झालेले फळ गोड असते अशा अनेक उत्तम उदाहरणांनी सादरीकरणाचे तंत्र विषद केले.

कोराडी येथे आयोजित या व्याख्यानाकरिता कोराडी वीज केंद्राचे मुख्य महाव्यवस्थापक श्री. ज्ञानेश्वर थुटूरकर तसेच चंद्रपूर, कोराडी, खापरखेडा, नागपूर आणि पारस येथील महानिर्मिती कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. महानिर्मितीचे संचालक (संचलन) श्री. मधुकर शेलार आणि कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्री. अरविंद चौधरी यांचे मार्गदर्शनाखली सदर प्रशिक्षणाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.